द्वितीय सत्राचे प्रमुख वक्ते डॉ.सुभाष गव्हे यांनी साथीच्या रोगाचे प्रतिबंध व नियंत्रण याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना नैसर्गिक आपत्तीमध्ये साथीचे रोग कसे निर्माण होतात. पाऊस पडल्यानंतर पाणी दूषित होते. त्यामुळे कावीळ, मलेरिया, ताप, थंडी साथीचे रोग निर्माण होतात. त्याचे दुष्परिणाम मानवाच्या आरोग्यावर होतात. त्यावर उपाय म्हणून पावसाळ्यात पाणी उकळून पिणे. घर आणि भोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे, साथीच्या रोगाविषयी जनजागृती करणे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.कुलकर्णी एस.व्ही. तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.देवडकर डी.टी. यांनी मानले.

तृतीय सत्र (३.०० ते ४.००वा.)

तृतीय सत्राचे प्रमुख वक्ते भारत गॅस कंपनीचे व्यवस्थापक मा.श्री.अमोल जोशी यांनी घरगुती गॅस वापर करतांना निर्माण होणा-या आपत्तीचे प्रतिबंध आणि नियंत्रण कसे करावे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हे करीत असतांना त्यांनी घरगुती गॅस वापरतांना कोणकोणत्या काळजी घ्याव्यात. घरातून बाहेर पडण्यापूर्वी गॅसचे बटण बंद करणे बाहेरहून घरी आल्यानंतर दरवाजा, खिडक्या उघडून देणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.सौ.गुजर पी.एस. यांनी मानले.

दुसरे प्रमुख वक्ते आर.बी.एन.बी कॉलेजचे प्राध्यापक व सर्पमित्र रोहित बकरे यांनी सर्पदंश झाल्यानंतर प्राथमिक उपचार याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी भारतात १८८ सापाच्या जाती आहेत. त्यामध्ये फक्त पाच जाती विषारी आहेत. आपल्या अवतीभोवती नाग, साप, घोणस, कवड्या, वाळा, दुतोंड्या, करडा, मनियार, अजगर इ. सापाच्या जाती आढळतात. सर्प दंश झाल्यानंतर त्या व्यक्तीने घाबरुन न जाता प्राथमिक उपचार म्हणून त्या ठिकाणी व त्याच्यावरती घट्ट कापड्याने बांधणे व दवाखान्यात उपचारासाठी जाणे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.डॉ.घोटेकर डी.बी. यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.वाघमारे एस. बी. यांनी मानले.

भोजन (१.०० ते ३.००वा.)

चतुर्थ सत्र (१.०० ते २.००वा.)

चतुर्थ सत्राच्या प्रमुख वक्त्या सौ.पोर्णिमा गुजर यांनी आपल्या नैसर्गिक आपत्ती व पाणीटंचाई या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये नैसर्गिक आपत्ती मानवाला घातक असतात. ज्या आपत्ती अचानक येतात व संपूर्ण मानवाची जिवित व वित्तीय हानी होते. त्यांना नैसर्गिक आपत्ती असे म्हणतात. नैसर्गिक आपतीमध्ये दुष्काळ पडल्यानंतर सर्व क्षेत्राला पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. यामध्ये औद्योगिक क्षेत्र, कृषी क्षेत्र व व्यापार क्षेत्रात मोठी हानी निर्माण होते. कृषी क्षेत्र पाण्यावर अवलंबून असते. जर पिकांना पाणी नसेल तर पिके चांगली येणार नाही. शेतक-यांचे आर्थिक नुकसान होईल. मराठवाडा, विदर्भ या ठिकाणी दुष्काळाचा परिणाम मोठ्या प्रमाणात जाणवतो. दुष्काळामुळे अनेक शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत व आजही करत आहेत. यावर उपाय म्हणून पाण्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे वाटते. त्यासाठी पाण्याविषयी लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.तुपे बी.जी. यांनी केले.

कार्यक्रम अधिकारी
विद्यार्थी कल्याण मंडळ

Chandrarao Dagdulal Jain College of Commerce, Shrirampur

प्राचार्य
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर.

(133)

रयत शिक्षण संस्थेचे,

चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व विद्यार्थी कल्याण मंडळयांच्या संयुक्त विद्यमाने,

# "आपत्ती व्यवस्थापन शिबिर"

## (दि.30 ते 31 डिसेंबर 2015)

## कार्यक्रमाची रुपरेषा

| वेळ | | तपशिल |
|---|---|---|
| प्रथम सत्र | | 30 डिसेंबर 2014 |
| 9.00 ते 10.00<br>10.00 ते 11.00<br>11.00 ते 12.00<br><br><br><br><br>12.00 ते 1.00 | : | नाष्टा व चहा<br>शिबिराचे उद्घाटन<br>प्रथम सत्र<br>प्रास्ताविक व स्वागत-प्रा.क्षिरसागर जी.एस.<br>प्रमुख वक्ते - मा.प्रा.ससाणे एस.बी.<br>विषय - नैसर्गिक आपत्ती व व्यवस्थापन<br>आभार प्रदर्शन-प्रा.बडा आर.बी<br>प्रास्ताविक व स्वागत-प्रा.कळमकर आर.पी.<br>प्रमुख वक्ते - मा.शेख ए.ए.<br>विषय - नैसर्गिक आपत्ती पाणी व चारा टंचाई<br>आभार प्रदर्शन-प्रा.कुलकर्णी एस.बी. |
| 1.00 ते 3.00 | : | भोजन |
| द्वितीय सत्र | | 30 डिसेंबर 2015 |
| 3.00 ते 4.00<br><br>4.00 ते 5.00 | : | प्रास्ताविक व स्वागत-प्रा.क्षिरसागर जी.एस.<br>प्रमुख वक्ते - मा.डॉ.सुभाष गलंडे<br>विषय - साथीच्या रोगाचे प्रतिबंध व नियंत्रण<br>प्रमुख वक्ते - मा.श्री.सुरेश मेवरे<br>विषय - आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य<br>आभार प्रदर्शन-प्रा.डॉ.देवढकर डी.टी. |
| तृतीय सत्र | | 31 डिसेंबर 2015 |
| 9.00 ते 10.00 | : | नाष्टा व चहा |
| 10.00 ते 11.30 | : | प्रास्ताविक व स्वागत-प्रा.सौ.जगताप एम.बी.<br>वक्ते - मा.श्री.अमोल अशोक जोशी<br>विषय - घरगुती गॅस वापर करताना निर्माण होणाऱ्या आपत्तीचे प्रतिबंध आणि नियंत्रण<br>आभार प्रदर्शन-प्रा.सौ.गुजर पी.एस. |
| 11.30 ते 1.00 | | प्रास्ताविक व स्वागत-प्रा.डॉ.पोटेकर डी.बी.<br>वक्ते - मा.श्री.रोहित बगाडे<br>विषय - सर्पदंश झाल्यानंतर प्राथमिक उपचार<br>आभार प्रदर्शन-प्रा.वाघमारे एस.बी. |
| 1.00 ते 2.00 | : | भोजन |
| चतुर्थ सत्र | | 31 डिसेंबर 2015 |
| 2.00 ते 3.00 | : | प्रास्ताविक व स्वागत-प्रा.सौ.जगताप एम.बी.<br>प्रमुख वक्ते -मा.सौ.गुजर पी.एस.<br>विषय - नैसर्गिक आपत्ती- पाणी टंचाई<br>आभार प्रदर्शन-प्रा.डॉ.गुपे वी.जी. |
| 3.00 ते 4.00 | : | प्रास्ताविक व स्वागत-प्रा.डॉ.गवळी एस.एन.<br>प्रमुख वक्ते - मा.श्री.महेश उदावंत<br>विषय - विषारी वायुगळती प्रतिबंध व नियंत्रण<br>आभार प्रदर्शन-प्रा.डॉ.बखळे एस.आर. |
| 4.00 ते 5.00 | | समारोप |

कार्यक्रम अधिकारी
विद्यार्थी कल्याण मंडळ

Shrirampur

प्राचार्य
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर







**Social Personal Responsibility**

# सामाजिक जबाबदारी जाणीव जागृती उपक्रम

## स्नेहालय २०१६-१७

### कार्यक्रम अहवाल

महाविद्यालातील विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने सामाजिक जबाबदारी जाणीव जागृती उपक्रमातून हे अभियान पार पडले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या घरून, परिसरातील रहिवाश्यांकडून दानशूर व्यक्तींकडून आर्थिक मदत, जुन्या अडगळीत पडलेल्या परंतु वापरण्यायोग्य वस्तू, लहान मुलांच्या वस्तू, अवजारे, उपकरणे इत्यादी जमा केले. स्नेहालयातील अधिकार्यांना बोलावून संकलित वस्तू सुपूर्द करण्यात आल्या. प्रत्येक वर्षी या महाविद्यालयातील विद्यार्थी स्नेहालयासाठी वस्तू व रोख रक्कम जमा करून पाठवितात. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना, व इतर विद्यार्थी आपला बहुमोल वेळ खर्च करून समाज सेवा म्हणून समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था शाळा महाविद्यालये येथून मदत जमा करून स्नेहालयला पाठवितात. क्वचित प्रसंगी स्नेहालयला भेट देऊन तेथील रुग्णाईत अनाथ बाळांशी सुसंवाद साधतात. . विद्यार्थ्यांच्या मनामध्ये समाज सेवेची आवड असते त्याला प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली म्हणजे त्यातील सुप्त गुण विकसित होतात.





**2016-17**

## ST Community Hostel Guidance Programme of Future Opportunity in Commerce



Hon. Principal Dr. L.D.Bhor guided the students of ST Community on the occasssion of "Birsa Munda Jaynti". He expressed his views on the ST community empowerment with the help of education as he share his personal experienced as he worked as Co-ordinnator for The Rayat Shikshan Sanstha's Ashram Schools in Mokada and Mumbai Regions. He told all studnets by birth nature has given the skills to ST community and be proud as it's respected Women Culture Society. Prof. Vivek M More guided students for placement opportunity in coming year. 13 studnets were from our college organises this activity in the Government ST Hostel Shrirampur.

254

रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर
## जि.अहमदनगर
## आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबीर
## दि ९ व १० फेब्रुवारी अहवाल सन २०१६-17

दि. ११/०२/२०१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ व १० फेब्रुवारी २०१७ रोजी 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान' शिबीर संपन्न झाले. सदर शिबीराचे उद्घाटन सकाळी ९:३० वाजता संपन्न झाले. या उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ हवामान अंदाज व प्रगत शेती तज्ञ मान. प्रा.बी.एन.शिंदे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या, रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या चेअरमन मा.सौ.मीनाताई जगधने व मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.एस.एन.गवळी, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा.डॉ.तुपे बी.जी. सर्व प्राध्यापक वृंद विद्यार्थी-विद्यार्थिनी सदर कार्यक्रमास उपस्थित होते.

### उद्घाटन समारंभ (स. ९.३० ते १०.३०)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.बी.जी.तुपे यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये अकस्मात येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी, आपत्ती विषयक जुजबी ज्ञान असणे तसेच आपत्ती पूर्वी घ्यावयाची खबरदारी, आपत्ती दरम्यान घ्यावयाची काळजी आणि आपत्ती नंतर घ्यावयाची काळजी या बद्दल आवश्यक ती माहिती असणे किंवा जाणून घेणे कधीही हितावह असते जेणे करून संभाव्य जीवित हानी असणे किंवा जाणून घेणे कधीही हितावह असते जेणे करुन संभाव्य जीवित व वित्त हानी अथवा संपूर्णतः जरी टाळता आली नाही तरी काही अंशी या हानीला आळा घालून त्याचे प्रमाण कमी करू शकतो. या वित्तीय व जीवित हानीपासून संरक्षण करण्यासाठी काही उपाययोजना सुचविणे व विद्यार्थ्यांमध्ये आपत्तीविषयी जागृता निर्माण करण्यासाठी असे शिबिर महाविद्यालयात घेतले जात असे नमूद केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या, रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या अध्यक्षा, मा.सौ.मीनाताई जगधने यांनी केले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आपत्ती काळात तसेच आपत्ती नंतर विशेषतः अल्पवयीन बालके, वृद्ध, महिला तसेच अपंग यांना कमीत कमी त्रास होईल याची दक्षता बाळगणे अत्यंत गरजेचे असते. त्याचप्रमाणे आपत्ती काळात पाणीपुरवठा, खाण्यापिण्याची व्यवस्था, वैद्यकीय सेवा, औषध सामग्री,

लोकसंख्येची व्यवस्था तसेच जनावरांना चारा इत्यादी सुरक्षित पद्धतीने यासाठीचा स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन करणे गरजेचे असते. त्यासाठी तितक्याच उत्स्फूर्तपणे लोकसहभाग मिळणे आवश्यक असते. तो आपल्याला जनजागृतीद्वारे साध्य करता येवू शकतो. म्हणूनच महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये यांविषयी जनजागृती होण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराचे आयोजन करणे गरजेचे वाटते.

मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयामध्ये अनेक प्रकारच्या नैसर्गिक व कृत्रिम आपत्ती येवू शकतात. त्यामध्ये भूकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, दंगल, दरोडा, चोरी, बॉम्बस्फोट अशा आपत्ती येवू शकतात. महाविद्यालयात इमारत कोसळणे शॉर्ट सर्किट होणे, गॅस गळती होणे, आग लागणे, विद्यार्थी-विद्यार्थिनींना धक्का येणे, रॅगिंग होणे, भांडणे होणे, प्रशासकीय ताणतणाव निर्माण होणे अशा अनेक आपत्ती येवून महाविद्यालयात समस्या निर्माण होऊ शकतात. या समस्यांवर उपाययोजना म्हणून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिर आयोजित करुन उपाययोजना सुचविणे आवश्यक असते असे नमूद केले. उद्घाटन समारंभाचे आभार प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस. यांनी मानले.

## प्रथम सत्र (स. १०.३० ते ०१.००)

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराच्या प्रथम सत्राचे प्रास्ताविक प्रा.कुलकर्णी एस.बी. यांनी केले. त्यांनी जागतिक हवामान बदलाचे शेतीवर होणारे परिणाम या विषयाच्या प्रास्ताविकामध्ये नैसर्गिक आपत्तीविषयी माहिती सांगताना त्यामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ या विषयी माहिती सांगितली. त्यांनी महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून सतत दुष्काळ पडत आहे. या दुष्काळाची मोठी झळ शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीमाल पाण्याशिवाय येवू शकत नाही. पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याची टंचाई शेतकरी आत्महत्या करीत आहे असे नमूद केले.

प्रमुख वक्ते ज्येष्ठ हवामान अंदाज व तज्ज्ञ शेती तज्ञ मा.प्रा.बी.एल.शिंदे यांनी जागतिक हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या प्रदेशात नैसर्गिक आपत्तीमध्ये दुष्काळ पडल्यानंतर सर्व क्षेत्रांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. यामध्ये कृषी क्षेत्राची सर्वात मोठी हानी होते, कृषी क्षेत्र पावसावर अवलंबून असते. जर पिकांना पाणी नसेल, हवामान अनुकूल नसेल तर पिके चांगली येणार नाही. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होईल. मराठवाडा, विदर्भ याठिकाणी दुष्काळाचा परिणाम मोठ्या प्रमाणात जाणवतो दुष्काळामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे आणि अजूनही करीत आहे. यावर उपाय म्हणून जागतिक हवामान बदलाची कारणे व उपाययोजना शोधून जनजागृतीद्वारे हवामानानुसार, पावसानुसार शेतीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे असे नमूद केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.खराडकर यु.एन. यांनी केले.

## भोजन (दु. १.०० ते ३.००)

## द्वितीय सत्र (दु ३.०० ते ४.००)

द्वितीय सत्राचे प्रमुख वक्ते मा.ससाने एस.बी. यांनी नैसर्गिक आपत्ती आणि व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतात भूकंप, पूर, दुष्काळ, वादळवारा या नैसर्गिक आपत्तींचे प्रतिबंध आणि नियंत्रण कसे करावे याबद्दल प्रात्यक्षिक देवून सविस्तर मार्गदर्शन केले. भूकंप आल्यावर काय करावे, काय करु नये, तसेच सर्व सजीवांची काळजी घ्यावी व सोबत आर्थिक, निर्जिव वस्तूंची काळजी घ्यावी असे नमूद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.कुलकर्णी एस.बी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.लोंढे आर.डी. यांनी केले.

## तृतीय सत्र दि. १०/०२/२०१७ (स. ११.०० ते १.००)

तृतीय सत्राचे प्रमुख वक्ते मानी.मानुरीता अधिकारी, डेप्युटी ऑफिसर मा.श्री.सुनिल बी.देशमुख यांनी आग नियंत्रण आणि प्रतिबंध या विषयावर विद्यार्थ्यांना आग नियंत्रणासंबंधी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आगीच्या प्रकारानुसार वेगवेगळी उपाययोजना कशी करावी याचे प्रात्यक्षिक दिले. तसेच फायर एक्सटिंग्विशर कसे वापरावे या विषयीदेखील प्रशिक्षण दिले. त्यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयात आग प्रतिबंधक उपाययोजनेसाठी काय प्रकारची व्यवस्था असावी या विषयीदेखील सविस्तरपणे मार्गदर्शन केले. आग ही प्रामुख्याने तीन घटकांमुळे निर्माण होते ती म्हणजे ज्वलनशील पदार्थ + ऑक्सिजन + पुरेसी उष्णता. या तिनपैकी एक घटक जरी आगीपासून दूर केला तर आग त्वरित नियंत्रणात येवू शकते. या बद्दल तीन वेगवेगळी आग नियंत्रणाची प्रात्यक्षिके दाखवून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.कुलकर्णी एस.बी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.तुरे बी.जी. यांनी केले.

## चतुर्थ सत्र (दु ३.०० ते ४.००)

चतुर्थ सत्रासाठी मे.सुमित गोविंद जोशी भारत गॅस वितरक, श्रीरामपूर येथिल व्यवस्थापक श्री.अभिजित काळे, अधिकारी श्री.अशोक शिंदे, श्री.विजय माने, श्री.संदिप मगाळे आदि उपस्थित होते. या सत्रासाठी लाभलेले प्रमुख वक्ते मा.श्री.अशोक शिंदे यांनी घरगुती गॅस वापर करतांना निर्माण होणाऱ्या आपत्तीचे प्रतिबंध आणि नियंत्रण कसे करावे या विषयावर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने गॅस सिलेंडर वापरात घेताना कोणकोणत्या गोष्टी तपासाव्यात गॅस लिक झाल्यावर किंवा गॅसचा वास येत असल्यास काय करावे आणि काय करू नये या बद्दल मार्गदर्शन केले. तसेच गॅस वापरणाऱ्याचे अधिकार कोणते आहेत. गॅस सिलेंडरने पेट घेतल्यास तो कसा विझवावा, स्फोट होण्यापासून कसा वाचवावा या बद्दल प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. तसेच घरगुती गॅसचा वापर करतांना काही आपत्ती निर्माण झाल्यास भारत सरकारने जारी केलेला ११०६ हा आपत्कालीन हेल्प लाईन नंबर देखील दिला. तसेच आपण एक आदर्श नागरिक असून

पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छ इंधनाचा वापर या संबंधी जनजागृती करण्यासंबंधात प्रमुख वक्त्यांच्या मार्गदर्शनानुसार प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी विद्यार्थ्यांकडून पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छ इंधनाचा वापर करण्यासंबंधी प्रतिज्ञा घेतली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.खराटकर यु.एन. यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले.

सदर शिबिराच्या यशासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराचे समन्वयक प्रा.कुलकर्णी एस.व्ही., विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.डॉ.तुपे बी.जी., प्रा.खराटकर यु.एन., प्रा.लांडे आर.डी., प्रा.दुग्गल एस.ए. यांनी विशेष श्रम घेतले तर प्रा.भावसार व्ही.एम. आणि प्रा.काळे पी.आर. यांनी सदर शिबिराचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रम अधिकारी
विद्यार्थी कल्याण मंडळ

प्राचार्य
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स
श्रीरामपूर







# वाचन प्रेरणा दिन
## कार्यक्रम अहवाल २०१७-१८

भारताचे माजी राष्ट्राप्रती भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स श्रीरामपूर मध्ये दि १५.१०.२०१७ रोजी डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा विवेक मोरे यांचे प्रमुख व्याख्यान झाले या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एल डी भोर, उपप्राचार्य डॉ. एस एन गवळी, प्रा के एस नवले उपस्थित होते.

प्रा विवेक मोरे आपल्या व्याख्यानात म्हणाले कि तमिळनाडूतील रामेश्वरम सारख्या समुद्र किनार्यावरील एका छोट्याश्या खेड्यात सर्व सामान्य कुटुंबात ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्म झाला. वडील नावाडी होते. मिळणाऱ्या उत्पन्नतून कुटुंब चालवत असे. डॉ. कलाम यांना लहान पणापासूनच काम करावे लागले. या कुटुंबावर रामेश्वरमचे धार्मिक संस्कार झाले होते याच कलाम यांनी आपल्या बुधीमतेच्या जोरावर यशाचे शिखर गाठले डी आर डी ओ, इस्रो सारख्या संस्थांचे संचालक पद भूशविले. भारत सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम पाहिले. मिसाईल मन म्हणून त्यांना उपाधी मिळाली. अग्निपंख, भारत २०-२० या पुस्तकातून त्यांच्या राष्ट्र उभारणीतील कामाची माहिती मिळते.

भारत सरकारने त्यांना भारतरत्न, पद्मविभूषण व पद्मभूषण या पुरस्कारांनी गौरविले. भारतातील ३० विद्यापीठांनी त्यांना मानद पदवी देऊन सन्मानित केले. मेघालयातील सिलोंग येथील विध्यार्थ्यासमोर बोलत असतानाच दि २७.०७.२०१५ रोजी मृतू आला. डॉ ए पी जे अबदुल कलाम यांनी आपल्या कार्यकार्तुत्वातून तमाम भारतीयांच्या मनात आदराची भावना निर्माण केली आहे.

प्राचार्य डॉ एल डी भोर यांनीही विद्यार्थाना समयोचित मार्गदर्शन केले. डॉ बापूसाहेब घोडके यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.





**Health Check-up Programme, 2017-18**





Health Awareness Programme in Wadala Mahadev on 6th Sept 2017 Dr. Jamdade Vasant guided the villagers for the Health Issues.

In the run up to the health camp, students of the C.D.Jain College of Commerce, Shrirampur visited the villagers and aware them about the camp and collected data in format of Rural Hospital Shirsagaon . The data submitted to the Dr. Jamdade Sir. All senior citizens eye, blood pressure check- up in the camp. 72 students were present for the event and Dr. Sayyed Sadik, Prof. Pawar Sushil and Dr. Bapusaheb Ghodke were present for the event.

# सामाजिक जबाबदारी जाणीव जागृती उपक्रम

## स्नेहालय २०१७-१८

### कार्यक्रम अहवाल

महाविद्यालातील विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने सामाजिक जबाबदारी जाणीव जागृती उपक्रमातून हे अभियान पार पडले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या घरून, परिसरातील रहिवाश्यांकडून दानशूर व्यक्तींकडून आर्थिक मदत, जुन्या अडगळीत पडलेल्या परंतु वापरण्यायोग्य वस्तू, लहान मुलांच्या वस्तू, अवजारे, उपकरणे इत्यादी जमा केले. स्नेहालयातील अधिकार्यांना बोलावून संकलित वस्तू सुपूर्द करण्यात आल्या. प्रत्येक वर्षी या महाविद्यालयातील विद्यार्थी स्नेहालयासाठी वस्तू व रोख रक्कम जमा करून पाठवितात. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना, व इतर विद्यार्थी आपला बहुमोल वेळ खर्च करून समाज सेवा म्हणून समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था शाळा महाविद्यालये येथून मदत जमा करून स्नेहालयला पाठवितात. क्वचित प्रसंगी स्नेहालयला भेट देऊन तेथील रुग्णाईत अनाथ बाळांशी सुसंवाद साधतात. . विद्यार्थ्यांच्या मनामध्ये समाज सेवेची आवड असते त्याला प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली म्हणजे त्यातील सुप्त गुण विकसित होतात.

# Disaster Management, 2017-18

रयत शिक्षण संस्थेचे,

सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

श्रीरामपूर. जि.अहमदनगर.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे व

विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

" आपत्ती व्यवस्थापन शिबीर"

अहवाल

दि . १५/१२/२०१७ ते
दि. १६/१२/२०१७

दि . १५ डिसेंबर व १६ डिसेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या समन्वयाने दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन शिबीराचे आयोजन करण्यात आले या शिबिरासाठी १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

१५ डिसेंबर २०१७ रोजी ९.३० ते १०.३० वाजता शिबिरार्थी व उपस्थिती मान्यवरांना चहा व नाष्ट्याचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटन समारंभ

१५ डिसेंबर २०१७, वेळ १०.३०

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या उद्घाटन समारंभासाठी अध्यक्षा म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत शैक्षणिक संकुलाच्या चेअरमन मा.सौ.मीनाताई जगधने, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरामपूर तालुक्याचे प्रांत अधिकारी मा.श्री.तेजस चव्हाण साहेब, महाविद्यालयाचे मा.प्राचार्य.डॉ.एल.डी.भोर, विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व उपस्थित मान्यवरांनी कर्मवीर अण्णा, कै.ती.सौ.लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात केली.

विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक करतांना आपत्ती व्यवस्थापन म्हणजे नेमकं काय ? या अभियान आयोजना मागची विद्यापीठाची, महाविद्यालयाची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगितली, आपत्तीचे वेगवेगळे प्रकार , त्यावर राखण्याचे प्रसंगावधान याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन दिली. उपस्थित मान्यवरांची ओळख व स्वागत करुन पुढील कार्यक्रमास सुरुवात झाली.

आपत्ती व्यवस्थापन शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्रीरामपूर तालुक्याचे प्रांतअधिकारी मा.श्री.तेजस चव्हाण साहेबांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. आपत्ती व्यवस्थापनामधील तीन टप्पे

त्यांनी सांगितले - आपत्तीपूर्व, आपत्ती दरम्यान व आपत्ती नंतर करण्यात येणारे व्यवस्थापनामधील फरक आणि त्याची गरज त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. आपत्तीची वेगवेगळी उदाहरणे देऊन त्या परिस्थितीमध्ये प्रशासन कशा प्रकारे कार्यवाही करत असते हे सांगत असतानाच एका जबाबदार नागरीक म्हणून समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी काय असते हे देखील त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.भोर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मा.सौ.मीनाताई जगधने, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत शैक्षणिक संकुलाच्या चेअरमन यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना किल्लारी चा भूकंप, त्सुनामी तसेच नुकतेच येऊन गेलेले ओखी वादळ असे वेगवेगळे प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना जागरूक राहण्याची व समयसूचक राहण्याचे मार्गदर्शन केले.

उद्घाटन समारंभाचे आभार प्रदर्शन प्रा.खराडकर यू.एन. यांनी मानले.

**प्रथम सत्र**

**वेळ - ११.३० ते १.००**

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या उद्घाटनानंतर प्रथम सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून श्री. अमोल अशोक जोशी, भारत गॅस कंपनी, श्रीरामपूर यांनी **"घरगुती गॅस वापर करतांना निर्माण होणा-या आपत्तींचे प्रतिबंध आणि नियंत्रण"** या विषयावर व्याख्यान दिले व प्रात्यक्षिके दाखविली. आज घरांमध्ये एल.पी.जी. गॅस सिलेंडर वापरले जाताना परंतु बऱ्याचदा क्षुल्लक निष्काळजीपणा मुळे अपघात झालेले दिसून येतात.

घरगुती गॅस वापरतांना कोणकोणत्या खबरदा-या घेणे गरजेचे आहे. हे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर काही प्रात्यक्षिके दाखवून समजावून सांगितली. विद्यार्थ्यांबरोबर प्रश्न उत्तरांमधून त्यांनी संवाद साधला. सर्वप्रथम अपघात होणारच नाही यासाठी घ्यावयाची काळजी असतेच, तसेच अपघात झाल्यास त्यावर नियंत्रणात्मक प्राथमिक उपचार त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

प्रथम सत्राचे प्रास्तविक व स्वागत प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सौ.खांडरे एस.आर. यांनी केले.

**भोजन**

**वेळ - १.०० ते २.३०**

शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी नियोजित भोजनाचा आस्वाद घेतला.

### द्वितीय सत्र
### वेळ - २.३० ते ३.३०

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या प्रथम दिवसाच्या द्वितीय सत्रासाठी मा.प्रा.ससाणे एस.बी. हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय **"ओखी वादळ आणि नैसर्गिक व्यवस्थापन"** असा होता. या सत्राचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.खराडकर यु.एन. यांनी केले. व्याख्यानास सुरुवात करताना प्रा.ससाणे यांनी आजपर्यंत भारत देशामध्ये झालेल्या वादळांचा आढावा घेतला व विद्यार्थ्यांना या नैसर्गिक आपत्तींची कारणे समजावून सांगितली. निसर्गावर मनुष्याने केलेले आक्रमण हे या प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीचे मूळ कारण असते, असे देखील त्यांनी नमूद केले.

नुकत्याच झालेल्या ओखी वादळाची कारण मिमांसा सांगून त्यासाठी सरकारने केलेल्या व्यवस्थापनाचा आढावा त्यांनी घेतला. एक सामाजिक घटक म्हणून प्रसंगी हजर असलेल्या नागरीकांची कर्तव्ये देखील त्यांनी विद्यार्थ्यांना विस्तृतपणे सांगितली. नैसर्गिक आपत्ती जरि माणसाच्या हातात नसल्या तरि देखील आपल्याकडून निसर्गाची हानी तर होत नाही ना याकडे लक्ष देणे हे भावी पिढीचे आद्य कर्तव्य बनलेले आहे असे त्यांनी सांगितले.

या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी केले.

दि. १६/१२/२०१७

### आपत्ती व्यवस्थापन शिबीर
### द्वितीय दिन - अहवाल

१६ डिसेंबर, २०१७ रोजी ९.३० ते १०.३० वाजता शिबिरार्थी विद्यार्थी तसेच उपस्थित मान्यवरांनी नियोजित चहा व नाष्टयाचा आस्वाद घेतला.

### तृतीय सत्र
### वेळ - १०.३० ते ११.३०

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या तृतीय सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून मा.श्री.सुनील देशमुख यांनी **"आग नियंत्रण आणि प्रतिबंध"** या विषयावर व्याख्यान देण्यासाठी निमंत्रीत करण्यात आले होते. या सत्राचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांनी केले.

आपल्या व्याख्यानामध्ये श्री. देशमुख यांनी सुरवातीला विद्यार्थ्यांना बोलते केले. आगीपासून येणा-या वेगवेगळया आपत्तींचे अनुभव विद्यार्थ्यांकडून ऐकून घेतले तसेच या आपत्ती घडण्यामागे असणारी कारणे विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. आगीपासून निर्माण होणा-या आपत्ती टाळण्यासाठी कोणत्या उपयायोजना करणे गरजेचे आहे हे त्यांनी सांगितले व तसेच आपत्ती घडल्यानंतर प्राथमिक उपचार कसे असावेत त्यावेळी

कोणती खबरदारी घेतली जावी हे देखील विद्यार्थ्यांना सोप्या शब्दात सांगितले. आग प्रतिबंध यंत्रणा वापर करण्याबाबतीत प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.

या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले.

**चौथे सत्र**

**वेळ - ११.३० ते १२.३०**

आपत्ती व्यवस्थापनाच्या चौथ्या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री.रोहित बखरे यांनी **"सर्पदंश झाल्यानंतर उपाययोजना व प्रतिबंध"** या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. व्याख्यानास सुरुवात करतानाच त्यांनी भारतात आढळणाऱ्या एकूण सापांपैकी अगदी कमी प्रमाणातील साप विषारी असतात हे विद्यार्थ्यांना सांगितले. सर्पदंशामुळे होणारे मृत्यू हे बऱ्याचदा विषबाधेमुळे न होता, भिती, गैरसमज व चुकीच्या उपचारांमुळे संभवतात हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रेझेंन्टेशनच्या माध्यमातून भारत देशात आढळणाऱ्या विविध सर्पजातींची ओळख त्यांनी करुन दिली तसेच सर्पदंश झाल्यानंतर करण्यात येणा-या उपाय योजना व प्रतिबंध यावर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या मनातील काही गैरसमज देखील या व्याख्यानाच्या माध्यमातून दूर झाले.

या सत्राचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थिनी मंच समन्वयक प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस. यांनी केले तर आभार प्रा.सौ.जगताप एम.बी.यांनी मानले.

**समारोप समारंभ**

**वेळ - १२.३०**

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या समारोप समारंभासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ.एल.डी.भोर हे होते. समारोप समारंभाचे प्रास्तविक व स्वागत विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी, मा.डॉ.तुपे बी.जी यांनी केले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांपैकी कु.सोनाली आसने, कु.प्रसाद झुराळे, कु.पुजा शिरसाठ यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत असतांना मा. प्राचार्यांनी दोन दिवसांमध्ये झालेल्या विविध व्याख्यानांचा आढावा घेतला. समारोप समारंभाचे आभार प्रदर्शन प्रा.सौ.साळवे एस.के. यांनी केले.

| | | |
|---|---|---|
| **विद्यार्थिनी मंच समन्वयक** | **विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी** | **प्राचार्य, सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर.** |


आपत्ती व्यवस्थापन शिबीर अभियान



**Teacher Parent Meet, 2015 to 2018**











पालक मेळावा


पालक मेळावा
उद्घाटन समारंभ


पालक मेळावा
उद्घाटन समारंभ


उद्घाटन समारंभ




पालक मेळावा
उद्घाटन समारंभ



## Book Exhibition, 2013 to 2018


















C.D.JAIN COLLEGE OF COMMERCE,SHRIRAMPUR






OLLEGE OF COMMERCE,SHRIRAMPUR

















## Book Exhibition Participant

| Year | S.N. | Name of School/ College | No. of Participants |
|---|---|---|---|
| 2013-14 | 1 | K. J. Somaiyya School, Shrirampur | 142 |
| | 2 | New English School, Shirasgaon | 133 |
| | 3 | Shivaji Vidyalaya, Wadalamahadev | 76 |
| | 4 | ASC College, Ashoknagar | 87 |
| 2014-15 | 1 | Shivaji Vidyalaya, Wadalamahadev | 69 |
| | 2 | Model English School, Shrirampur | 142 |
| | 3 | Sent Xevior School, Shrirampur | 153 |
| | 4 | K. J. Somaiyya School, Shrirampur | 163 |
| 2015-16 | 1 | Sent Xevior School, Shrirampur | 147 |
| | 2 | Khatod Kanya Vidyalaya, Shrirampur | 103 |
| | 3 | D. D. Kachole Vidyalaya, Shrirampur | 89 |
| | 4 | S. S. B. College of Education, Shrirampur | 59 |
| | 5 | R. B. N. B. College, Shrirampur | 123 |
| 2016-17 | 1 | S. S. B. College of Education, Shrirampur | 28 |
| | 2 | Sent Xevior School, Shrirampur | 121 |
| | 3 | Model English School, Shrirampur | 139 |
| | 4 | R. B. N. B. College, Shrirampur | 119 |
| 2017-18 | 1 | Govindrao Adik Law College, Shrirampur | 78 |
| | 2 | K. J. Somaiyya School, Shrirampur | 123 |
| | 3 | D. D. Kachole Vidyalaya, Shrirampur | 58 |
| | 4 | ASC College, Ashoknagar | 54 |
| | 5 | Khatod Kanya Vidyalaya, Shrirampur | 89 |

Principal
C.D. Jain College of Commerce
Shrirampur